# जिल्हादंडाधिकारी कार्यालय,उस्मानाबाद

## (उपचिटणीस शाखा)

दूरध्वनी क्रमांक 02472-227301 Email ID- rdc1osmanabad@gmail.com

वाचा- 1. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, अधिसूचना क्र. करोना 2020/प्र.क्र. 58/आरोग्य 5 दि. 13 मार्च 2020.

2. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, अधिसूचना क्र. करोना 2020/प्र.क्र. 58/आरोग्य 5 दि. 14 मार्च 2020.

3. आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005 चे कलम 30, 33, 34, 41 व कलम 51.

4. या कार्यालयाचे आदेश क्र. 2020/उपचिटणीस/एमएजी/सीआर-26 दि. 11 मे 2020.

5. या कार्यालयाचे आदेश क्र. 2020/उपचिटणीस/एमएजी-3/सीआर-26 दि. 21 सप्टेंबर 2020.

6. महाराष्ट्र शासन, महसूल व वने, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, अधिसूचना क्र. DMU/2020/CR.92/DisM-1 दि. 30 सप्टेंबर 2020, 14 ऑक्टोबर 2020, 23 ऑक्टोबर 2020, 29 ऑक्टोबर 2020, 03 नोव्हेंबर 2020, 14 नोव्हेंबर 2020, 23 नोव्हेंबर 2020, 27 नोव्हेंबर 2020, 29 डिसेंबर 2020.

7. या कार्यालयाचे आदेश क्र. 2020/उपचिटणीस/एमएजी-3/सीआर-26 दि. 01 ऑक्टोबर 2020, दि. 27 ऑक्टोबर 2020, 02 नोव्हेंबर 2020, 05 नोव्हेंबर 2020, 15 नोव्हेंबर 2020, 24 नोव्हेंबर 2020, 01 डिसेंबर 2020, 31 डिसेंबर 2020.

8. महाराष्ट्र शासन, महसूल व वने, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, अधिसूचना क्र. DMU/2020/CR.92/DisM-1 दि. 29 जानेवारी 2021.

9. या कार्यालयाचे आदेश क्र. 2020/उपचिटणीस/एमएजी-3/सीआर-26 दि. 29 जानेवारी 2021.

10. मा. मुख्यमंत्री आणि मा. उपमुख्यमंत्री महोदयांचे अध्यक्षतेखाली दि. 16 फेब्रुवारी 2021 रोजी झालेल्या व्ही. सी. मधील सूचना.

---

क्र.2020/उपचिटणीस/एमएजी/सीआर- 26
दिनांक:- 18 /02/2021.

**विषय:-** कोविड-19 विषाणूंचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनांच्या अनुषंगाने पारीत केलेले आदेश, निर्देश, SOP इत्यादींचे प्रभावी अंमलबजावणीबाबत.

**आदेश:-**

ज्याअर्थी उपरोक्त वाचा क्र. 2 चे अधिसूचनेद्वारे महाराष्ट्र शासनाने "महाराष्ट्र कोव्हीड 19 उपाययोजना नियम, 2020" प्रसिद्ध केले असून यातील नियम क्र. 3 नुसार करोना विषाणुमुळे (COVID-19) उद्भवलेल्या संसर्गजन्य रोगाचा प्रतिबंध व नियंत्रण यासाठी जिल्हाधिकारी यांना त्यांचे कार्यक्षेत्रात सक्षम प्राधिकारी म्हणून घोषित केले आहे.

ज्याअर्थी संदर्भ क्र. 8 च्या अनुषंगाने संदर्भ क्र. 9 अन्वये उस्मानाबाद जिल्ह्यात कोव्हिड 19 या विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी लॉकडाऊनचा कालावधी दिनांक 28 फेब्रुवारी 2021 पर्यंत वाढविला आहे व लॉकडाऊनच्या कालावधीत करावयाच्या कार्यवाहीबाबत संदर्भ क्र. 4 ते 9 मध्ये नमूद आदेशान्वये तसेच या कार्यालयाने वेळोवेळी पारित केलेल्या आदेशांन्वये सविस्तर मार्गदर्शक सूचना दिलेल्या आहेत.

त्याअर्थी मी कौस्तुभ दिवेगावकर, जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, उस्मानाबाद कोविड-19 विषयी मा. मुख्यमंत्री आणि मा. उपमुख्यमंत्री महोदयांचे अध्यक्षतेखाली दि. 16 फेब्रुवारी 2021 रोजी राज्यातील सर्व विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी यांच्यासमवेत झालेल्या व्हीडीओ कॉन्फरन्समध्ये देण्यात आलेल्या सूचनांचे अनुषंगाने उस्मानाबाद जिल्ह्यात खालील प्रमाणे तात्काळ कार्यवाही करणेबाबत आदेशित करीत आहे.



Scanned by CamScanner

1. Incident Commander तथा उपविभागीय अधिकारी व तहसिलदार, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, मुख्याधिकारी, नगर परिषद यांनी त्यांच्या अधिकारक्षेत्रातील सर्व मंगल कार्यालये, कोचिंग क्लासेस, खाजगी शाळा, अनुदानित व विनाअनुदानित शाळा/विद्यालय/महाविद्यालय, बँक्वेट हॉल, हॉटेल्स, रेस्टॉरंट, नाट्यगृहे, चित्रपटगृहे, व्यायामशाळा, शॉपिंग मॉल्स, धार्मिक स्थळे, उद्याने, व इतर गर्दी होणारी स्थळे या ठिकाणी वेळोवेळी अचानक भेट देऊन तपासणी करावी. सदर ठिकाणी प्रमाणित कार्यप्रणाली (SOP) मधील मर्यादेपेक्षा जास्त संख्येत लोक उपस्थित असतील, उपस्थित लोकांनी नाक व तोंडावर मास्क लावलेले नसतील, हँड सॅनिटायझरची उचित व्यवस्था नसेल, त्यांना प्रथम वेळी नोटीस देऊन उचित दंड आकारावा. नोटीस देताना पुढील तपासणीत हीच परिस्थिती राहिली तर गुन्हा दाखल करण्यात येईल असा स्पष्ट उल्लेख नोटीस मध्ये करावा. त्याच ठिकाणी दुस-या वेळेस जर अशीच परिस्थिती राहिली तर संबंधित प्रतिष्ठानांवर गुन्हा दाखल करावा अथवा सदर प्रतिष्ठान 15 दिवसांकरिता सील करण्याची कार्यवाही करावी. तसेच सार्वजनिक ठिकाणी नाक व तोंडावर मास्क न वापरणा-या व्यक्तींवर प्रथम वेळी रु. 500/- व पुन्हा आढळल्यास रु. 1000/- एवढा दंड आकारावा.
2. जिल्ह्यातील कोणते CCC सेंटर बंद आहेत व कोणते CCC सेंटर चालू करावे लागणार आहेत यासंबंधीची पूर्वतयारी करावी. कोरोनाचा संसर्ग वाढत असेल त्या भागात किंवा परिसरात टार्गेटेड पद्धतीने तपासण्या कराव्यात, एकेका रुग्णांचे किमान 20 तरी संपर्क शोधलेच पाहिजेत. ज्या भागात कोरोनाचा रुग्ण सापडला असेल त्या ठिकाणी निदान मायक्रो सिलिंग तरी करावे. पेशंटच्या घरातील सर्वांची कोविड तपासणी करावी. भाजी मंडई, दुकानदार अशा लोकांच्या ठराविक अंतराने नियमित कोरोना चाचण्या कराव्यात. सर्व राजकीय पक्षांना राजकीय कार्यक्रम घेताना शासनाने ठरवून दिलेल्या SOP प्रमाणेच कार्यवाही करणे बंधनकारक असेल.
3. जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा आरोग्य अधिकारी, जि. प. उस्मानाबाद, वैद्यकीय आरोग्य अधिकारी, न. प./न.पं. यांनी अध्यक्ष, इंडियन मेडिकल असोसिएशन यांचे समवेत सर्व खाजगी प्रॅक्टिस करणा-या डॉक्टरांची बैठक आयोजित करावी. सदर बैठकीत ज्या रुग्णांना सर्दी, ताप, खोकला अशी लक्षणे असतील व त्यांना असे वाटत असेल की रुग्णाला कोविड-19 रोगाची प्राथमिक लक्षणे दिसून येत आहेत तर त्यांनी अशा रुग्णांना ताबडतोब कोविड-19 ची टेस्ट करून घेण्यासंबंधीच्या सूचना द्याव्यात. तसेच जिल्ह्यास उपलब्ध असलेले सर्व व्हेंटीलेटर्स चालू आहेत किंवा कसे याची खात्री करून घ्यावी. सार्वजनिक ठिकाणी मास्कचा वापर करणे,. सामाजिक अंतर ठेवणे, ठराविक अंतराने, हाथ साबणाने स्वच्छ धुणे याविषयी व्यापक प्रमाणात जनजागृती करावी.
4. सर्व आगारप्रमुख राज्य परिवहन महामंडळ जिल्हा उस्मानाबाद यांनी बस स्थानकांवर तसेच बसेस मध्ये प्रवाशांकडून मास्कचा वापर व कोविड-19 च्या प्रतिबंधात्मक उपाययोजनांचे पालन होण्याकरिता आवश्यक कार्यवाही करावी आणि बसेसच्या चालक व वाहकांनाही त्याअनुषंगाने आवश्यक त्या सूचना द्याव्यात.
5. सर्व Incident Commander यांनी त्यांचे अधिनस्थ असलेल्या CCC सेंटर मधील कोविड-19 च्या अनुषंगाने उपलब्ध झालेली साधनसामुग्री सुस्थितीत असल्याची खात्री करावी व उपरोक्त सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे.
6. पोलीस विभाग, Incident Commander, नगर परिषद/नगर पंचायत, ग्रामपंचायत यांनी मास्क वापराच्या सक्तीची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी संयुक्त पथकांची स्थापना करून सार्वजनिक ठिकाणी तसेच रस्त्यांवरून जाणा-या वाहनांची तपासणी करावी व सार्वजनिक ठिकाणी मास्क न वापरणा-या व्यक्तींवर, वाहनधारकांवर दंडात्मक कार्यवाही करावी.
7. कोविड-19 च्या वाढत्या संसर्गाच्या पार्श्वभूमीवर श्री. तुळजाभवानी मंदिर संस्थान, तुळजापूर येथे श्री. तुळजाभवानी देवीजींच्या दर्शनासाठी येणा-या भाविकांना दैनंदिन मोफत दर्शन पास संख्या 10,000



Scanned by CamScanner

व दैनंदिन पेड दर्शन पास संख्या 2000 एवढी निश्चित करण्यात येत आहे. व्यवस्थापक, श्री. तुळजाभवानी मंदिर संस्थान यांनी याबाबत आवश्यक कार्यवाही करावी. तसेच पासेस देताना 65 वर्षावरील ज्येष्ठ नागरिक व 10 वर्षाखालील लहान मुले यांना तसेच मास्क न वापरणा-या भाविकांना पासेस देण्यात येऊ नयेत. तसेच या कार्यालयाचे आदेश दि. 15 नोव्हेंबर 2020 मध्ये नमूद केलेल्या धार्मिक स्थळे/प्रार्थनास्थळे याठिकाणी करावयाच्या कार्यवाहीबाबतच्या SOP चे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

8. शासकीय कार्यालयांमध्ये अभ्यागतांची गर्दी होऊ नये याअनुषंगाने सर्व शासकीय कार्यालयप्रमुखांनी नोडल अधिकारी यांची नियुक्ती करावी. सदर नोडल अधिकारी यांनी कार्यालयामध्ये येणा-या अभ्यागतांना पुन्हा दुस-या दिवशी कार्यालयामध्ये येण्याची आवश्यकता भासू नये व कार्यालयामध्ये अभ्यागतांची गर्दी होऊ नये याअनुषंगाने त्यांची निवेदने,अर्ज यांवर तात्काळ आवश्यक कार्यवाही करावी.

9. सद्यस्थितीत सार्वजनिक परिवहन व्यवस्थे (रेल्वे, बस इ.) द्वारे प्रवाशांची जिल्हांतर्गत तसेच आंतरजिल्हा/आंतरराज्य आवक-जावक सुरु झालेली असल्याने अशा प्रकारे प्रवास करून आलेल्या प्रवाशांनी ताप, सर्दी, खोकला इ. कोविड-19 सदृश्य लक्षणे दिसून आल्यास तात्काळ स्वत:हून गृह विलगीकरणात (Home Quarantine) रहावे व तात्काळ कोविड-19 ची चाचणी करून घ्यावी.

सदर आदेशाची अंमलबजावणी दिनांक 18.02.2021 पासून तात्काळ लागू करण्यात येत आहे.

(कौस्तुभ दिवेगावकर)
जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,
जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, उस्मानाबाद

**प्रत:-** 1. मा. संचालक, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन, मंत्रालय, मुंबई-32 यांना माहितीस्तव सविनय सादर.
2. मा. विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांना माहितीस्तव सविनय सादर.

**प्रत:- आवश्यक कार्यवाहीसाठी**

1. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद.
2. पोलीस अधीक्षक, उस्मानाबाद.
3. जिल्हा शल्य चिकित्सक, उस्मानाबाद.
4. जिल्हा आरोग्य अधिकारी, उस्मानाबाद.
5. अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, उस्मानाबाद.
6. जिल्हा क्रीडा अधिकारी, उस्मानाबाद.
7. विभाग नियंत्रक, रा. प. उस्मानाबाद.
8. जिल्हा प्रशासन अधिकारी, न. पा. प्र. जि. का. उस्मानाबाद.
9. जिल्हा माहिती अधिकारी, उस्मानाबाद.
10. INCIDENT COMMANDER तथा उपविभागीय दंडाधिकारी सर्व जिल्हा उस्मानाबाद.
11. उपमुख्य कार्यकारी अधिकारी, ग्रा. पं. जि. प. उस्मानाबाद.
12. सहाय्यक आयुक्त, अन्न व औषध प्रशासन, उस्मानाबाद.
13. INCIDENT COMMANDER तथा तालुका दंडाधिकारी सर्व जिल्हा उस्मानाबाद.
14. गट विकास अधिकारी सर्व जिल्हा उस्मानाबाद.
15. मुख्याधिकारी सर्व नगर परिषद व नगर पंचायत जिल्हा उस्मानाबाद.
16. सर्व संबंधितांस अनुपालनास्तव.

जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,
जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, उस्मानाबाद

DISTRICT MAGISTRATE
OSMANABAD



Scanned by CamScanner